# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 24.08.2024** **वार– शनिवार**

---

**हवामान**

हवामान विभागानं पुणे जिल्ह्यात आज 24 आणि उद्या 25 ऑगस्टसाठी लाल बावटा जारी केला आहे. पुणे जिल्ह्यातील खडकवासलासह इतर धरणांमधून पाणी सोडण्यात आलं असून त्यात वाढ होण्याची शक्यता असून नागरिकांनी दक्षता घ्यावी असं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

**हेलिकॉप्टर**

पुण्यातील पौड परिसरात आज एका खासगी कंपनीचं हेलिकॉप्टर कोसळून त्यातील चार प्रवासी जखमी झाल्याचं वृत्त आहे. हेलिकॉप्टर मुंबईहून हैदराबादला जात असताना संभाव्य तांत्रिक बिघाड आणि वाईट हवामानामुळं झाडावर आदळून त्याचा अपघात झाला. यातील जखमीला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून इतर दोघाना पौड इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवण्यात आलं असल्याची माहिती पोलिस निरीक्षक मनोज यादव यांनी दिली आहे.

**साखर-अधिवेशन**

साखर कारखानदारी आणि ऊस उत्पादन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान आणण्याचं आव्हान असून त्यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांनी संशोधन आणि तंत्रज्ञान विकसित करावं, असं आवाहन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज पुण्यात दी डेक्कन शुगर तंत्रज्ञ संघटनेच्या एकोणसत्तराव्या वार्षिक अधिवेशन आणि प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी दूरस्थ पद्धतीनं केलं. साखर आयुक्त डॉक्टर कुणाल खेमनार, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील आदि मान्यवर उपस्थित होते. आज केवळ साखर उत्पादनावर अवलंबून राहण्यासारखी परिस्थिती नाही. ऊसतोडणीचा खर्च मोठा असून अजूनही परदेशातून हार्वेस्टर आयात करावे लागतात असं विखे-पाटील यांनी नमूद केलं. साखर आयुक्त डॉक्टर खेमनार म्हणाले की कारखान्यांचं आर्थिक आणि जमीन व्यवस्थापन, हरित हायड्रोजन, ड्रोनचा वापर, यांत्रिकीकरण आदी विषयांवर आयुक्तालयानं कार्यशाळा घेतल्या आहेत. हर्षवर्धन पाटील म्हणाले की देशातील साखर कारखाने आधुनिक करुन त्यांना दिशा देण्याच्या कामात साखर महासंघानं

सिंहाचा वाटा उचलला आहे. साखर कारखाने आणि ऊस उत्पादन क्षेत्राशी तंत्रज्ञ, संशोधक यावेळी उपस्थित होते.

**गणेश**

गणेश मंडळांनी सीसीटीव्ही, सांस्कृतिक कार्यक्रम आणि पारंपरिक वाद्यांवर भर द्यावा असं आवाहन उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी चतु:शृंगी पोलीस ठाणं आणि पुणे महानगरपालिकेद्वारे आयोजित सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या बैठकीत आज केलं. पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्यासह अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**ध्वनी**

गणेशोत्सव काळात पुण्यातील ध्वनी प्रदूषण मर्यादेत ठेवण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनांसंदर्भात प्रतिज्ञापत्र सादर करण्याच्या सूचना राष्ट्रीय हरित लवादानं राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाला दिल्या आहेत. पुण्यातील एका डॉक्टरांनी यासंदर्भात हरित लवादाकडं अर्ज दाखल केला आहे. पुढील आठवड्यात या प्रकरणी पुढील सुनावणी होत असून तत्पूर्वी हे प्रतिज्ञापत्र सादर करावं लागणार आहे.

**आराखडा**

पुणे शहरात समाविष्ट 11 गावांचा विकास आराखडा करण्यासाठी मुदतवाढ देण्याची पुणे महापालिकेची मागणी फेटाळून लावत राज्य शासनानं हा विकास आराखडा ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला आहे. पुणे महापालिकेत हद्दीलगतची 11 गावे 4 ऑक्टोबर 2017 रोजी महापालिकेत समाविष्ट करण्याची अधिसूचना शासनानं काढली होती.

**उड्डाण**

गोव्यातील खासगी विमान कंपनीकडून येत्या 31 ऑगस्टपासून पुणे-गोवा आणि पुणे-सिंधुदुर्ग अशी नवी विमानसेवा सुरु केली जाणार आहे.प्रत्येक आठवड्याच्या शनिवार आणि रविवार अशी दोन दिवस ही सेवा दिली जाणार असून प्रवाशांकडून मिळणाऱ्या प्रतिसादाच्या आधारे उड्डाणांच्या संख्येत वाढ केली जाईल. पुण्यातून सिंधुदुर्ग आणि गोव्यात पर्यटनासाठी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या फार मोठी असून त्यांना पुरेशी आणि सोयीची रेल्वे सेवा उपलब्ध नाही.

**युवाकार्य**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेखाली पिंपरी चिंचवड महापालिकेच्यावतीनं युवकांना कार्यप्रशिक्षण देण्यासाठी शहरातील प्रमुख औद्योगिक आस्थापनांच्या पदाधिकाऱ्यांसमवेत आयुक्त शेखरसिंह यांनी बैठक घेतली. औद्योगिक आस्थापनांनी या योजनेसाठी तयार केलेल्या

संकेतस्थळावर नोंदणी करावी, तसंच रोजगारासाठी इच्छुकांनी संकेतस्थळावर नोंदणी केल्यानंतर त्यांना संधी उपलब्ध करून देण्यात येईल असं आयुक्तांनी सांगितलं.

**द्राक्ष**
अवेळी पडणारा पाऊस, तापमानातील चढ-उतार यावर मात करण्यासाठी संरक्षित द्राक्ष शेती करून उच्च प्रतीचं उर्वरित अंश विरहित द्राक्ष उत्पादन घेण्याचं आवाहन डॉक्टर बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉक्टर एस. डी. सावंत यांनी इंदापूर इथं केलं. राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, इंदापूर येथील महात्मा फुले कृषी विज्ञान केंद्र आणि कृषी विभागाच्या आत्मा अंतर्गत शास्त्रज्ञ-शेतकरी सुसंवाद तसंच द्राक्ष फळ छाटणी चर्चासत्रात डॉक्टर सावंत बोलत होते.

**पुरस्कार**
स्वरयोगिनी डॉक्टर प्रभा अत्रे पुरस्कृत इंदिरा अत्रे बालसाहित्य पुरस्कार डॉ. संजय ढोले, फारुक काझी आणि चंद्रमोहन कुलकर्णी यांना जाहीर झाला आहे. रोख रक्कम आणि सन्मानपत्र असं पुरस्काराचं स्वरूप आहे.

**आपत्ती**
हवामान बदलाचा अनुभव जागतिक पातळीवर सर्वच ठिकाणी स्पष्ट दिसत असून विद्यार्थ्यांनी आपत्ती निवारणासह आपत्ती व्यवस्थापन यावर लक्ष केंद्रित करावे असे आवाहन केंद्रीय गृह मंत्रालयाच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे प्रकल्प संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता यांनी केलं आहे. ते आज पुण्यातील एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या इनोव्हेशन हबच्या राइड इनोव्हेशन कॉन्क्लेव्ह 2024 च्या समारोप प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार**.